**प्रेसनोट** दिनांक 18/06/2014

मा. भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांचेकडील सुचनेस अनुसरुन पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक 2014 करिता कार्यक्रम जाहीर झालेली असुन पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदान दिनांक 20 जुन 2014 शुक्रवार रोजी सकाळी 8 ते 4 यावेळेत होणार आहे. सोलापूर जिल्हयामध्ये पदवीधर मतदार संघा करीता एकुण 67892 व शिक्षक मतदार संघा करीता 12837 एवढे मतदार आहेत.सदरहू निवडणुक करीता पदविधर मतदार संघा करीता 109 व शिक्षक मतदार संघा करीता 81 मतदान केंद्र आहेत. त्या करीता 1010 एवढे कर्मचारी नियुक्त करणेत आलेले आहेत. सोलापूर शहर मध्ये पदवीधर मतदार संघा करीता सेंट जोसेफ प्राथमिक शाळा , हिदुस्थान कॉनव्हेंन्ट स्कुल सोलापूर ,नुतन मराठी शाळा सोलापूर ,सिध्देश्वर प्रशाला सोलापूर ,नॉथकोट प्रशाला सोलापूर ,सिध्देश्वर प्राथमिक शाळा सोलापूर याठिकाणी मतदान केंद्रे आहेत. तसेच शिक्षक मतदार संघा करीता हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर याठिकाणी मतदान केंद्रे आहेत.

तसेच पदवीधर व शिक्षक मतदारांनी त्यांचे नाव मतदार यादीत शोधणे कामी www.solapur.nic.in या संकेत स्थळावर सर्च इंजिन निवडणुक विभागात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यावर अथवा पदवीधर मतदारांनी www.dydeopune.com व शिक्षक मतदारांनी www.teacher.dydeopune.com या संकेत स्थळावर भेट द्यावी व आपले नाव मतदार यांदीमध्ये आहे किंवा कसे हे तपासावे .तसेच मतदाना दिवशी शासकीय / निमशासकीय/खाजगी संस्था /कंपन्या इत्यादी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांना सकाळी 4 तास कामावर उशिरा येण्याची किंवा सायंकाळी 4 तास लवकर जाण्याची किंवा मधल्या सोयीच्या वेळेमध्ये 4 तास अनुपस्थित राहण्याची सवलत देण्यात यावी. शासकीय / निमशासकीय/खाजगी संस्था /कंपन्या यांनी लागु राहील.

मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी मतदारांना मतदान ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. जर मतदाराकडे मतदान ओळखपत्र नसल्यास खालील नमुद पैकी एखाद्या पुरावा मतदान करण्यासाठी सोबत ठेवावा.

1.पासपोर्ट 2.वाहन परवाना 3.पॅनकार्ड 4. डिग्री /डिप्लोमा सर्टिफीकेट 5. नोकरीचे ठिकाणीचे ओळखपत्र

6. फोटोसह असलेले कोणत्याही बॅकेचे पासबुक 7. फोटोसह असलेल प्रॉपर्टीचा उतारा 8. रेशन कार्ड (ज्यावर 31/05/2014 पूर्वी फोटोसह असलेले ) 9. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती /इतर मागासवर्ग सर्टिफीकेट ( 31 /05/2014 पूर्वी समक्ष अधिका-यानी दिलेले ) 10. हत्यार लायसन्स जे 31/05/2014 पुर्वी दिलेला असला पाहिजे. 11.अंपग सर्टिफिकेट ( 31 /05/2014 पूर्वी समक्ष अधिका-यानी दिलेले 12. आधार कार्ड.

13.स्मार्ट कार्ड. (आरजीआय यांनी नपीआरच्या व्दारा दिलेले.)तरी मतदारांनी मतदान करते वेळी वरील पैकी कोणताही एक पुरावा दाखवीणे आवश्यक आहे. तरी सर्व मतदारांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

( डॉ. प्रवीण गेडाम )
जिल्हाधिकारी सोलापूर